पाहिजेत
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास फ्रेश/अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

व्यवसाय
आपण ज्येष्ठ, सेवानिवृत्त, गृहिणी आहात का?
आपला वेळ, शिक्षण यांचा उपयोग करून नामाकित कंपनीत आपल्याला वेळेत कामाची सुवर्णसंधी!
निश्चित उत्पन्न ■ कोणतीही गुंतवणूक नाही
संपर्क : 8087459854

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २६६ वा | मंगळवार, दि. ०२ जून २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# सीना नदीत पाणी सोडा, अन्यथा पालकमंत्र्यांना फिरु देणार नाही




## माढा तालुक्यातील शेतकरी आक्रमक, तहसीलवर भव्य मोर्चा

**माढा (कटूसत्य वृत्त):-** सध्या राज्यात तापमानाचा पारा 40 ते 45 अंशाच्या घरात गेला आहे. वाढत्या तापमानामुळं नदी नाले, विहीरी बोअरवेल कोरडे पडले आहेत. यामुळं विविध भागात शेतकऱ्यांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.

अशीच स्थिती माढा तालुक्यातील सीना नदीकाठच्या शेतकऱ्यांची झाली आहे. सीना नदी कोरडी पडली आहे. त्यामुळं शेतकऱ्यांची पिकं जळू लागली आहेत. त्यामुळं सीना कोळेगाव धरणातून सीना नदीत पाणी सोडावं या मागणीसाठी आज माढा तहसील कार्यालयावर शेतकऱ्यांनी भव्य मोर्चा काढाला. पुढच्या तीन दिवसात सीना कोळेगाव धरणातून जर सीना नदीत पाणी सोडले नाहीतर पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासह आमदार खासदार राजकीय नेत्यांना सोलापूर जिल्ह्यात फिरु देणार नसल्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

### ... तर पाऊस पडल्यावरही कोळेगावचे पाणी सीना नदीत सोडू नका

ज्यावेळी पाऊस पडला जातो त्यावेळी सीना कोळेगाव धरणातून मोठ्या प्रमाणात सीना नदीत पाणी सोडले जाते. मागील वर्षी अचानक सीना कोळेगाव धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सीना नदीत सोडण्यात आला, परीणामी सीना नदीला महाभयंकर अशा प्रकारचा पूर आला होता. यामुळं शेती पिकांचं, जमिनींचं, घराचं मोठं नुकसान झालं होतं. पाऊस पडल्यावर पाणी सोडले जाते, तर मग आताच का पाणी सोडले जात नाही? असा सवाल शेतकऱ्यांनी केला आहे. आता जर पाणी सोडले नाहीतर पाऊस पडल्यावर देखील सीना कोळेगाव धरणातून पाणी सोडू नये असी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली आहे. तुम्हाला जिथे पाणी सोडायचे तिथे सोडा मात्र सीना नदीत पाऊस पडल्यावर पाणी सोडून नका असेही शेतकीर म्हणाले. आम्ही काय पाकिस्तानमध्ये राहतो का? असा सवालही शेतकऱ्यांनी केला आहे. त्यामुळं पुढच्या तीन दिवसात पाणी सोडावं अन्यथा पालकमंत्र्यांना जिल्ह्यात फिरु देणार नसल्याचा इशारा यावेळी शेतकऱ्यांनी दिला आहे.

### मोर्चाला मोठ्या संख्येनं शेतकऱ्यांची उपस्थिती

सीना कोळेगाव धरणातून सीना नदीत पाणी सोडावं या मागणीसाठी आज माढा तहसील कार्यालयावर शेतकऱ्यांनी भव्य मोर्चा काढला. या मोर्चात मोठ्या संख्येनं शेतकरी उपस्थित होते. शिवसेना शिंदे गटाचे नेते मनोज साठे यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाला राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाने देखील पाठिंबा दिला होता. शरद पवार पक्षाचे नेते संजय पाटील घाटणेकर देखील यावेळी उपस्थित होते. त्याचबरोबर गावोगावचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य देखील मोठ्या संख्येनं उपस्थित होते. पाणी आमच्या हक्काचं आहे, ते मिळाल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही अशी भूमिका यावेळी शेतकऱ्यांनी घेतली.

### नेमक्या काय आहेत मागण्या?

1. सीना कोळेगाव धरणातून सीना नदीत शेतीसाठी त्वरीत पाणी सोडण्यात यावे.
2. उजनी धरणातील पाण्याचे योग्य नियोजन करुन पाण्याचे समान वाटप करावे
3. पुरग्रस्त शेतकऱ्यांना प्रलंबित नुकसान भरपाईची रक्कम त्वरीत देण्यात यावी
4. 2 हेक्टरपेक्षा जास्त जमिन असलेल्या शेतकऱ्यांना खरवडून गेलेल्या जमिनीची नुकसान भरपाई त्वरीत मिळावी
5. सीना नदीवरील सर्व बंधारे दुरुस्त करुन नवीन दारे बसवण्यात यावीत
6. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतीसाठी पूर्ण क्षमतेने 12 तास वीज देण्यात यावी

# अभिजित दीपके भारतात येणार

## दिल्लीतील जंतर-मंतरवर आंदोलनाचा मुहूर्त ठरला!

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** कॉकरोच जनता पार्टीर्चा संस्थापक अभिजीत दीपके 6 जून रोजी भारतात परतणार आहेत. शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दिल्लीतील जंतर मंतर आंदोलन करणार आहे.

अभिजितने'एक्स' अकाउंटवर 'कॉकरोच इज बॅक' ही माहिती दिली. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अलीकडील 'कॉकरोच' (झुरळ) वक्तव्यानंतर 'कॉकरोच जनता पार्टी' हे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म उदयास आले. सीजेपीचे इन्स्टाग्रामवर 20 दशलक्षाहून अधिक फॉलोअर्स आहेत.

### अभिजित सध्या अमेरिकेत

30 वर्षीय अभिजीत दीपके छत्रपती संभाजी नगरमधील असून डिजिटल मीडिया स्ट्रॅटेजिस्ट आहे.वृत्तानुसार, अभिजीतने पुण्यात पत्रकारितेचे शिक्षण घेतले असून सध्या तो अमेरिकेतील बोस्टन युनिव्हर्सिटीमध्ये पब्लिक रिलेशन्समध्ये पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेत आहे. अभिजीतने 2020 ते 2022 या काळात केजरीवाल यांच्या आम आदमी पार्टीसाठी सोशल मीडिया स्ट्रॅटेजिस्ट म्हणून काम केले. 2020 च्या दिल्ली विधानसभा निवडणुकीदरम्यान, अभिजीतने 'आप'साठी व्हायरल मीम-आधारित ऑनलाइन प्रचार साहित्य तयार केले होते. एका मुलाखतीत अभिजीतने खुलासा केला की, त्याने वैयक्तिक आयुष्य आणि आर्थिक स्थैयार्सा‍ठी 'आप' सोडले आणि बोस्टन युनिव्हर्सिटीमध्ये अर्ज केला. प्रवेश मिळाल्यानंतर तो अमेरिकेत स्थायिक झाला. अभिजीत आपल्या 'एक्स' अकाउंटवरून शेतकऱ्यांच्या आंदोलनापासून ते महागाईपर्यंतच्या राजकीय मुद्द्यांवरून केंद्र सरकार आणि पंतप्रधानांना लक्ष्य करत आहे.

(पान 2 वर..)




### कॉकरोच जनता पार्टीचे 'एक्स' अकाउंट सध्या बंद

29 मे रोजी, दिल्ली उच्च न्यायालयाने कॉकरोच जनता पार्टीच्या 'एक्स' अकाउंटवरील बंदी उठवण्यास नकार दिला. न्यायालयाने सरकार आणि 'एक्स'कडून चार आठवड्यांच्या आत प्रतिसाद मागितला आहे. दीपकने दिल्ली उच्च न्यायालयात सीजेपीचे 'एक्स' अकाउंट ब्लॉक करण्याच्या निर्णयाला आव्हान दिले आहे. यावर न्यायमूर्ती पुरुषेंद्र कुमार कौर यांच्या खंडपीठाने म्हटले की, सरकारची बाजू ऐकल्याशिवाय असा आदेश पारित केला जाऊ शकत नाही, कारण या प्रकरणाचे दूरगामी परिणाम आहेत. पुढील सुनावणी 6 जुलै रोजी होणार आहे.

# विधान परिषदसाठी सोलापूरात भाजपकडून राजेंद्र राऊत यांचा अर्ज

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विधान परिषद निवडणुकीसाठी भाजपने पुन्हा एकदा बार्शीला झुकते माप दिले. जिल्हा परिषद अध्यक्षापाठोपाठ आता विधान परिषदेची उमेदवारी राजेंद्र राऊत यांना दिली.

महायुतीतर्फे राऊत यांनी अर्ज दाखल केला. तर, दुसरीकडे कॉंग्रेसतर्फे आदित्य फत्तेपूरकर व इतरांनी अर्ज दाखल केले. पक्षाने जी जबाबदारी दिली ती पूर्ण करू, असा विश्वास भाजपचे उमेदवार राऊत यांनी व्यक्त केला. तर बिनविरोध निवडणूक करू, असा विश्वास पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी व्यक्त केला.

महायुतीतर्फे अर्ज दाखल करताना महायुतीचे सर्व पक्षाचे नेते उपस्थित होते. शिवसेना (शिंदे) खासदार ज्योती वाघमारे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे (अ. प.) संजयमामा शिंदे यासह महापौर, जिल्हा परिषद अध्यक्ष, नगरसेवक, राऊतसमर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, राऊत अर्ज दाखल करताना त्यांच्यासोबत सांगोल्याचे शेकापचे आमदार बाबासाहेब देशमुख हे समर्थकांसहित उपस्थित होते. भाजप आणि शेकापच्या या नव्या युतीची सर्वत्र चर्चा सुरू झाली आहे.





मराठवाड्याचे प्रवेशद्वार म्हणून ओळख असलेल्या सोलापूर जिल्ह्यातील बार्शीला दुसऱ्यांदा राजकीय संधी भाजपने दिली आहे. विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी भाजपकडे इच्छुकांची संख्या जास्त होती. यात माजी आमदार प्रशांत परिचारक, राजेंद्र राऊत, शहाजी पवार, रोहन देशमुख, राम सातपुते यांनी दावा केला. मात्र, शेवटी परिचारक का राऊत असे चित्र झाले. अखेर भाजपने बार्शीचे राजेंद्र राऊत यांना उमेदवारी दिली. राऊत यांनी नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती या निवडणुकीत पक्षाला एकहाती सत्ता मिळवून दिली. त्याचे बक्षीस म्हणून जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद बार्शीला भाजप श्रेष्ठीने दिले. यानंतर आता विधान परिषदेचे उमेदवारी राजेंद्र राऊत यांना देण्यात आल्याने पुन्हा एकदा बार्शीला भाजपने झुकते माप दिले.

### निवडणूक बिनविरोध करू : पालकमंत्री गोरे

त्यांपैकी चारशेच्या आसपास महायुतीची मते आहेत. त्यामुळे महायुतीच्या उमेदवाराला विजय सोपा आहे. विरोधकांकडे पुरेसे संख्याबळ नाही. त्यामुळे विरोधकांनी इतिहास करून दाखवावा आणि बिनविरोध करावी. यासाठी सर्वांशी चर्चा करीन, असा विश्वास पालकमंत्री गोरे यांनी दाखवला आहे.

या निवडणुकीसाठी कॉंग्रेस पक्षाने आदित्य ऊर्फ दादा फत्तेपूरकर यांना उमेदवारी दिली. फत्तेपूरकर यांनी अर्ज दाखल केल्यानंतर थेट पालकमंत्री यांना लक्ष्य केले. पालकमंत्री यांच्या मनमानी कारभाराविरोधात आणि नगरसेवक, सदस्य यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी निवडणूक लढवीत आहे, असे फत्तेपूरकर यांनी जाहीर केले. त्याच बरोबरीने राष्ट्रवादी कॉंग्रेसतर्फे (शप) वसंत देशमुख, शिवसेनेचे (शिंदे) महेश साठे, नागेश अक्कलकोटे, धनंजय डिकोळे यांनी अर्ज दाखल केले.

दरम्यान, अर्जाची छानणी २ जूनला, तर अर्ज माघार घेण्याची अंतिम मुदत ४ जून आहे. त्यामुळे पुढील चार दिवसांत निवडणूक होणार, की बिनविरोध करण्यात पालकमंत्री यशस्वी होणार याकडे राजकीय विश्लेषकांचे लक्ष लागले आहे. निवडणूक बिनविरोध करू : पालकमंत्री गोरेया निवडणुकीसाठी ६१६ मतदार आहेत.दरम्यान, अर्जाची छानणी २ जूनला, तर अर्ज माघार घेण्याची अंतिम मुदत ४ जून आहे. त्यामुळे पुढील चार दिवसांत निवडणूक होणार, की बिनविरोध करण्यात पालकमंत्री यशस्वी होणार याकडे राजकीय विश्लेषकांचे लक्ष लागले आहे.

### महायुतीसोबत शेकाप

महायुतीतर्फे अर्ज दाखल करताना महायुतीचे सर्व पक्षाचे नेते उपस्थित होते. शिवसेनेच्या (शिंदे) खासदार ज्योती वाघमारे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे (अप) संजय शिंदे यांसह महापौर, जिल्हा परिषद अध्यक्ष, नगरसेवक, राऊतसमर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्याच वेळी सांगोल्याचे शेकापचे आमदार बाबासाहेब देशमुख उपस्थित होते. त्यामुळे महायुतीचे संख्याबळ वाढणार आहे. 'हितचिंतक' खूप आहेत, असे गोरे म्हणाले होते. त्याचा हा एक प्रकार आहे का, अशी कुजबूज सुरू आहे.

### परिचारकसमर्थक नाराज

परिचारक यांना उमेदवारी मिळेल असे वाटत होते. मात्र, ऐनवेळी त्यांचा पत्ता कट झाला. २०२१ च्या विधानसभा पोटनिवडणुकीत परिचारक इच्छुक होते. मात्र आवताडे यांना तिकीट मिळाले. त्यानंतर नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीतदेखील आवताडे यांना तिकीट मिळाले. त्या वेळी भाजपचे तत्कालीन प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी विधान परिषदेचा शब्द दिला. मात्र, आता उमेदवारी डावलल्याने समर्थक नाराज झाले. राजीनाम्याची तयारी दाखवली आहे. आता ही नाराजी दूर होणार का, असा सवाल उपस्थित झाला आहे.

# उजनीतील पाणीसाठा उणे 21 टक्क्यांवर


## १० जूननंतर पाणी केवळ पिण्यासाठी राखीव

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रात मॉन्सूनचे आगमन साधारणपणे १० ते १५ जूनदरम्यान होण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली असली, तरी यंदा 'सुपर एल निनो'च्या प्रभावामुळे सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर उजनी धरणातील पाणीसाठा उणे २१ टक्क्यांपर्यंत घसरल्याने १० जूननंतर धरणातील पाणी केवळ पिण्यासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

गतवर्षी चांगल्या पावसामुळे उजनी धरण शंभर टक्के भरले होते. डिसेंबरअखेर धरणात ११३ टीएमसी इतका पाणीसाठा उपलब्ध होता. सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाल्याने अतिरिक्त पाणी नदीपात्रातून सोडावे लागले होते. मात्र, यंदाच्या तीव्र उन्हाळ्यात शेतीसाठी सलग दोन महिने धरणातून पाणी सोडण्यात आले. तसेच २३ एप्रिल रोजी भीमा नदीतही पाणी सोडण्यात आले होते.

सध्या कालवे आणि नदीमार्गे होणारा पाणीपुरवठा बंद करण्यात आला असून करकंब परिसरातील कालव्यात सुरू असलेला पुरवठादेखील १० जूननंतर थांबविण्यात येणार आहे. त्यानंतर



धरणातील उपलब्ध पाणीसाठा केवळ पिण्याच्या गरजांसाठी राखून ठेवला जाणार आहे.

१ मे रोजी उजनी धरणात ५५.५७ टीएमसी मृत पाणीसाठा म्हणजेच उणे १५.११ टक्के पाणी उपलब्ध होते. मात्र महिन्याभरातच हा साठा कमी होऊन ३१ मे रोजी ५२.४१ टीएमसी म्हणजे उणे २१ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. वाढत्या तापमानामुळे मोठ्या प्रमाणावर बाष्पीभवन झाल्यानेही पाणीसाठ्यावर परिणाम झाला आहे.

दरम्यान, मॉन्सून उशिरा येण्याची शक्यता आणि कमी पावसाचा अंदाज लक्षात घेता प्रशासनाने सावध भूमिका घेतली आहे. भविष्यात पाऊस आणखी लांबल्यास भीमा नदीत पाणी सोडण्याची गरज निर्माण झाल्यास त्याबाबतचा अंतिम निर्णय राज्य शासन घेईल, असे जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

# नागेश म्हेत्रे मित्र परिवाराच्या वतीने खा.प्रा.डॉ. ज्योतीताई वाघमारे व गुणीजनांचा सत्कार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नागेश म्हेत्रे मित्र परिवाराच्या वतीने राज्यसभेचे नुतन खासदार प्रा. डॉ. सौ. ज्योतीताई वाघमारे व मोची समाजातील नुतन नगरसेवक, नुतन पदाधिकारी व १० वी, १२ वी तील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात अखिल भारतीय नाट्य परिषदेचा पद्माकर देव सभागृहात माजी आमदार प्रकाश यलगुलवार यांच्या शुभहस्ते व जेष्ठ नेते सुधीरजी खरटमल यांच्या अध्यक्षते खाली व माजी महापौर संजय हेमगड्डी, माजी स्थायी समिती सभापती देवेंद्र भंडारे, नागेश (अण्णा) म्हेत्रे, अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष मुश्ताक बेन्नीशिरुर, शहर अध्यक्ष ॲड. राजु जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

मोची समाजातील नुतन खासदार प्रा. डॉ. सौ. ज्योतीताई वाघमारे यांच्यासह नुतन नगरसेवक प्रा. नरसिंह असादे, स्विकृत नगरसेवक ऋषिकेश मेट्रे, रेल्वे सल्लागार बोर्डाचे नुतन सदस्य दिनेश म्हेत्रे, नुतन मोची समाज जिल्हाध्यक्ष सैदप्पा जंगडेकर, जनरल सेक्रेटरी जगन्नाथ सज्जन, कार्याध्यक्ष बाबा करगुळे, सोशल बँकेचे संचालक राजेंद्र कोरे, सो.म.पा. चे वैद्यकीय अधिकारी योगेश पल्लेलु, सेवानिवृत्त कर्मचारी रमेश फुले, आमआदमी पार्टीचे नुतन शहर अध्यक्ष निलेश संगेपाग इत्यादींचा सत्कार करण्यात आला.



सत्काराप्रसंगी नुतन खासदार प्रा. डॉ. सौ. ज्योतीताई वाघमारे यांनी मिळालेल्या संधीचा उपयोग सर्व सामान्य दिन-दलित, गोर-गरीब जनतेच्या विकासासाठी व समाजातील विद्यार्थी व युवकांसाठी शैक्षणिक व रोजगार विषयक उपक्रम राबवुन समाजामध्ये प्रबोधन करण्याचा संकल्प व्यक्त केला. व सत्काराबद्दल नागेश म्हेत्रे मित्र परिवाराचे व एन. एम. फाऊंडेशनचे आभार मानले.

या प्रसंगी सर्व मान्यवरांनी गुणीजनांचा व नुतन खासदारांचा गुणगौरव करुन नागेश म्हेत्रे मित्र परिवार व एन.एम. फाऊंडेशनाच्या वतीने घेण्यात आलेल्या विविध उपक्रमांची प्रशंसा केली.

या प्रसंगी १० वी, १२ वी नंतर पुढे काय? या विषयावर ड्रिम फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. काशिनाथ भतगुणकी यांचे पालक व विद्यार्थ्यांसाठी अभ्यासपूर्ण व मौलिक मार्गदर्शन झाले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मुख्य निमंत्रक शैलेंद्र मोरे यांनी केले व प्रस्तावीक विश्वेंद्र मोरे यांनी केले. तर अभार जॉर्ज बंडेल्लु यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रविकांत मस्के, एजाज शेख, डॉ. किरण खरात, वामसी म्हेत्रे, अभिषेक म्हेत्रे, गोविंद हेमरेड्डी, अक्षय फुले इत्यादींनी परिश्रम घेतले.

# सोलापूर जिल्ह्यात ५४ ठिकाणी हातभट्टी निर्मिती; ३०० हून अधिक गावांत पुरवठा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात विषारी दारू प्राशनामुळे २४ जणांचा मृत्यू झाल्यानंतर राज्यभर हातभट्टीच्या अवैध व्यवसायाचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. मात्र, सोलापूर जिल्ह्यात आजही ५४ ठिकाणी मोठ्या प्रमाणावर गावठी दारू अर्थात हातभट्टीची निर्मिती होत असून तिचा पुरवठा ३०० हून अधिक गावांपर्यंत केला जात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

विशेष म्हणजे, या अवैध व्यवसायाची संपूर्ण माहिती ग्रामीण पोलिस आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे उपलब्ध आहे. हातभट्टी निर्मितीची ठिकाणे तसेच अवैध विक्री होणाऱ्या गावांची यादीही संबंधित यंत्रणांनी तयार केली आहे. त्यानुसार ग्रामीण पोलिसांकडून 'ऑपरेशन परिवर्तन', तर राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून 'हातभट्टीमुक्त गाव' अभियान राबविले जात आहे.

दरवर्षी या मोहिमांअंतर्गत मोठ्या प्रमाणावर छापेमारी केली जाते. त्यामध्ये सरासरी साडेसात लाख लिटर गुळमिश्रित रसायन आणि सुमारे ४० हजार लिटर हातभट्टी नष्ट करण्यात येते. मात्र, या कारवायांनंतरही जिल्ह्यातील हातभट्टीचा व्यवसाय पूर्णपणे बंद झालेला नाही.



कारवाईदरम्यान अनेकवेळा रसायनयुक्त गावठी दारू नव्या बाटल्यांमध्ये भरून त्यावर नामांकित कंपन्यांची बनावट लेबले आणि बूच लावल्याचे प्रकारही उघडकीस आले आहेत. त्यामुळे ग्राहकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होत असून विषारी दारू दुर्घटनांसारख्या घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.पुण्यातील दुर्घटनेनंतर सोलापूर जिल्ह्यातील हातभट्टी निर्मिती आणि विक्रीवर अधिक कठोर कारवाईची मागणी आता जोर धरू लागली आहे. स्थानिक नागरिक आणि सामाजिक संघटनांनी संबंधित यंत्रणांनी केवळ मोहिमा न राबवता या अवैध साखळीचे कायमस्वरूपी उच्चाटन करण्यासाठी प्रभावी पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## संपादकीय

# नफेखोरी

पेट्रोल आणि डीझेलच्या दरात तसेच सीएनजीच्या दरात आता पुन्हा वाढ (Profit) झाल्याची बातमी एव्हाना सगळ्यांना समजली आहे. सरकारी मालकीच्या इंधन कंपन्यांना आर्थिक तोटा होतो आहे म्हणून ही दरवाढ केली जात असल्याचे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात वस्तुस्थिती खूप वेगळी आहे.

गेल्या आर्थिक वर्षातील चौथ्या तिमाहीतील आकडेवारी नुकतीच जाहीर झाली आहे, त्यानुसार जानेवारी ते मार्च 2024 या तीन महिन्यांच्या काळात देशातल्या सरकारी तेल कंपन्यांना तब्बल 24 हजार 985 कोटी रुपये इतका नफा (Profit) झाला आहे.

त्यात इंडियन ऑइल कॉर्पोरेशनने आपल्या नफ्यात तब्बल 78 टक्के इतकी वाढ नोंदवत या तिमाहीमध्ये 14 हजार 458 कोटी रुपये इतका नफा कमवला. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन या कंपनीला 4 हजार 902 कोटी रुपये इतका नफा झाला, तर भारत पेट्रोलियम कंपनीला 5 हजार 625 कोटी रुपये इतका नफा झाला आहे.

या तीनही कंपन्यांनी केवळ तीन महिन्यांतच सुमारे 25 हजार कोटी रुपये नफा कमावला आहे. संपूर्ण आर्थिक वर्षाचा विचार केला तर या तेल कंपन्यांना इंधन विक्रीतून तब्बल 77 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त नफा झालेला आहे.

या तेल कंपन्या नफेखोरीसाठी इतक्या चटावलेल्या आहेत की, आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचा दर किंचित जरी वाढला तरी सरकार इंधनाच्या दरात तातडीने वाढ करून या कंपन्यांच्या तिजोऱ्या भरण्याचे काम करते.

गेल्या दहा वर्षांत या सरकारी तेल कंपन्यांनी पेट्रोल, डीझेलच्या विक्रीतून नेमका किती नफा कमवला आहे याची अनेक लोकांना कल्पना नाही. पण या आकडेवारीवर लक्ष टाकले तर असे लक्षात येते की, गेल्या दहा वर्षांत सरकारी तेल कंपन्यांनी तब्बल तीन ते साडेतीन लाख कोटी रुपये इतका विक्रमी नफा कमवला आहे.

2016 पासून या कंपन्यांना नफा मिळायला सुरुवात झाली. आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाचा दर तेव्हापासून सातत्याने घटत गेला आणि तेव्हापासूनच केंद्र सरकार आणि तेल कंपन्यांनी देशातल्या सर्वसामान्य लोकांची लूट चालू केली. हा नफेखोरीचा धंदा आजतागायत चालू आहे.

केवळ करोनाच्या दोन वर्षाच्या काळात काही प्रमाणात इंधनविक्री ठप्प झाल्याने या नफ्याचे प्रमाण घसरले होते, परंतु करोनाचे संकट दूर झाल्यानंतर म्हणजे 2022 सालापासून ही लूट पुन्हा सुरू झाली आहे.

केवळ तेल कंपन्याच नव्हे तर केंद्र सरकारही इंधनाच्या विक्रीतून गेल्या दहा वर्षांत मालामाल झाले आहे. एका आकडेवारीनुसार, गेल्या दहा वर्षांत केंद्र सरकारने इंधनावरील उत्पादन शुल्कात वाढ करून तब्बल 28 ते 32 लाख कोटी रुपये सामान्य जनतेकडून उकळले आहेत.

ही सगळी पार्श्वभूमी आणि जनतेकडून लुटलेले लाखो कोटी रुपये लक्षात घेतले तर सध्या पश्चिम आशियातील युद्धामुळे कच्च्या तेलाचे जे दर वाढले आहेत त्याचा भार थेट सामान्य जनतेवर टाकण्याऐवजी केंद्र सरकार आणि तेल कंपन्यांना हा भार सोसणे सहज शक्य होते. निदान जनतेचा उद्रेक आपल्याला सहन करावा लागणार नाही याची बुज तरी केंद्र सरकारने राखायला हवी होती. पण इंधनातून अब्जावधी रुपये लुटणाऱ्या या सरकारला जनतेची जराही दया येताना दिसत नाही, हेच यातून स्पष्ट होते आहे. गेल्या 10-12 दिवसांत देशात पेट्रोल आणि डीझेलच्या दरात चौथ्यांदा वाढ करण्यात आली आहे. ही वाढ कोणत्याच अर्थाने समर्थनीय नाही.

आजपर्यंत इंधनाच्या विक्रीतून जो पैसा तेल कंपन्या आणि केंद्र सरकारने कमावला आहे त्यातला थोडा वाटा जनतेला परत देऊ केला असता, तरी पेट्रोल डीझेलचे दर सामान्य पातळीवर राखणे सहज शक्य होते, असे अनेक अर्थतज्ज्ञांचे म्हणणे आहे. पण सरकारला मात्र हे म्हणणे अजिबातच पटणारे नाही, त्यांनी सरसकट पुन्हा जनतेच्या खिशावर डल्ला मारण्याचे काम सुरू केले आहे.

केंद्र सरकारचा एक आवडता युक्तिवाद असा असतो की, देशातील पेट्रोल डीझेलचे दर हे कच्च्या तेलाच्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील दरांवर अवलंबून असतात. हे जर खरे असेल तर मग ज्या वेळेला कच्च्या तेलाचे दर खूप खालच्या पातळीवर आले होते त्यावेळी त्या प्रमाणात इंधनाचे दर का कमी केले गेले नाहीत, हा प्रश्न हजार वेळा सरकारला विचारून झाला आहे. पण सरकार कसल्याच बाबतीत कोणाचे काहीही ऐकण्याच्या मनस्थितीत नाही.

सामान्य जनतेच्या हालअपेष्टा कशा कमी होतील याकडे सरकार संवेदनशीलपणे लक्ष देत आहे, असे गेल्या दहा-बारा वर्षांत कधीही जाणवले नाही किंबहुना ते अनुभवाला आलेले नाही. सध्या तर मनमानी पद्धतीने दरवाढ करूनही देशातल्या नागरिकांना सगळीकडे सहजपणे हे इंधन उपलब्ध आहे असेही चित्र दिसत नाही.

देशाच्या अनेक भागात पेट्रोलपंपांवर प्रचंड मोठ्या रांगा लागलेल्या असून अनेक ठिकाणी तर डीझेल उपलब्धच नसल्याचे बोर्ड सातत्याने झळकत आहेत. हवे तेवढे दर घ्या पण आता निदान इंधन सगळीकडे नियमित स्वरूपात तरी उपलब्ध करून द्या आणि आमचे हाल थांबवा, अशी विनंती अनेक भागातल्या लोकांवर सरकारकडे करण्याची वेळ आली आहे.

या सरकारला आजच तपपूर्ती झाली आहे. आता गेल्या बारा वर्षांतील उपलब्धी लोकांपुढे नाचवली जाईल आणि इव्हेंट मॅनेजमेंट करून जनतेच्या डोळ्यात पुन्हा धूळफेक केली जाईल. बिचारी जनता मात्र या सरकारच्या नाकर्तेपणाचे ओझे यापुढेही वाहत राहील.

# ‘सरकारी गुंड’

## ‘सरकारी वर्दीतले गावगुंड?’ वाढत्या पोलीस गैरवर्तनाच्या आरोपांमुळे निर्माण झालेले प्रश्न.

लोकशाही व्यवस्थेत पोलीस दल हे कायद्याचे रक्षक मानले जाते. नागरिकांच्या जीवित आणि मालमत्तेचे संरक्षण करणे, गुन्हेगारांवर कारवाई करणे आणि कायदा-सुव्यवस्था राखणे ही त्यांची प्रमुख जबाबदारी आहे. मात्र राज्यातील विविध भागांतून सातत्याने समोर येणाऱ्या तक्रारींमुळे पोलीस दलाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

एकेकाळी मटका, हातभट्टी दारू, खंडणी, मारामारी, दहशत आणि विविध बेकायदेशीर धंद्यांसाठी कुख्यात असलेल्या गावगुंडांची भीती समाजात होती. परंतु आज काही ठिकाणी परिस्थिती अशी निर्माण झाल्याचा आरोप होत आहे की, सत्तेचा आणि पदाचा गैरवापर करणारे काही अधिकारी व कर्मचारीच नागरिकांसाठी त्रासदायक ठरत आहेत.

नागरिकांच्या तक्रारीनुसार, काही ठिकाणी पोलीस ठाण्यांमध्ये सामान्य माणसाला न्याय मिळवण्यासाठी हेलपाटे मारावे लागतात. राजकीय दबाव, आर्थिक व्यवहार, पक्षपाती चौकशी, निवडक कारवाया आणि प्रभावशाली व्यक्तींना मिळणारे संरक्षण यामुळे पोलीस दलाच्या निष्पक्षतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. काही प्रकरणांमध्ये निरपराध व्यक्तींना त्रास देणे, तक्रार दाखल करण्यास टाळाटाळ करणे किंवा प्रभावशाली व्यक्तींविरुद्ध कारवाई करण्यास अनास्था दाखवणे असे आरोपही होत असतात.

विशेषतः स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होऊन सेवेत आलेल्या अधिकाऱ्यांकडून समाजाला मोठ्या अपेक्षा असतात. ज्ञान, संवेदनशीलता आणि प्रामाणिकपणाच्या बळावर प्रशासनात सकारात्मक बदल घडवून आणण्याची जबाबदारी त्यांच्यावर असते. मात्र काही अधिकाऱ्यांच्या वर्तनामुळे संपूर्ण यंत्रणेची प्रतिमा मलीन होत असल्याची खंत व्यक्त केली जाते. तथापि, काही व्यक्तींच्या चुकीच्या वर्तनामुळे संपूर्ण पोलीस दलाला दोषी ठरविणेही योग्य ठरणार नाही. अनेक पोलीस अधिकारी आणि कर्मचारी जीव धोक्यात घालून कर्तव्य बजावत असतात. गुन्हेगारांविरुद्ध कठोर कारवाई करणारे, नागरिकांना मदत करणारे आणि प्रामाणिकपणे सेवा देणारे अधिकारीही मोठ्या संख्येने आहेत. खरा प्रश्न हा आहे की, अधिकारासोबत जबाबदारी आणि उत्तरदायित्व किती प्रभावीपणे जोडले गेले आहे? पोलीस दलावरील लोकांचा विश्वास टिकवण्यासाठी अंतर्गत शिस्त, पारदर्शक चौकशी, भ्रष्टाचाराविरुद्ध शून्य सहनशीलता आणि नागरिकाभिमुख कार्यपद्धती आवश्यक आहे.

लोकशाहीत पोलीस हे "सरकारी गुंड" नसून "कायद्याचे रक्षक" असले पाहिजेत. परंतु जेव्हा सत्तेचा गैरवापर, अन्याय किंवा पक्षपाताच्या तक्रारी वाढतात, तेव्हा समाजात अशा तीव्र प्रतिक्रिया उमटणे स्वाभाविक ठरते. त्यामुळे शासन आणि पोलीस नेतृत्वाने जनतेच्या मनातील संशय दूर करून विश्वास पुनर्स्थापित करण्यासाठी ठोस पावले उचलण्याची गरज आहे.

"वर्दीचा सन्मान अधिकारामुळे नाही, तर न्याय आणि प्रामाणिकपणामुळे टिकून राहतो."

# लालपरीला वाढदिवसाच्या शुभेच्छा!



महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाची जीवनवाहिनी समजल्या जाणाऱ्या एसटीचा आज म्हणजे १ जूनला ७८ वा वाढदिवस आहे. १ जून १९४८ रोजी पुणे - नगर या मार्गावर पहिली एसटी धावली होती. आज एसटी महामंडळाचा विस्तार झाला आहे. गाव तेथे एसटी, रस्ता तिथे एसटी या ब्रीदवाक्यनुसार एसटीचा विस्तार होत गेला. गावागावात आज एसटी पोहचली आहे. एकूण ३१ विभागातून एसटीचे कामकाज केले जाते त्याचप्रमाणे आंतरराज्यीय सेवा देखील पुरवली जातेय. कर्नाटक, गोवा, आंध्रप्रदेश, तेलंगणा, गुजरात, मध्यप्रदेश या राज्यात आज एसटी पोहचली आहे. राज्यातील कोट्यवधी प्रवाशांच्या लाडक्या लालपरीने काळानुसार कात टाकली असून, अनेक बदलही केले आहेत. लालपरीपासून हिरकणी, शिवनेरी, शिवशाही आता विठाई असा एसटीचा चेहरामोहरा बदलत गेला आहे. एसटी म्हणजे केवळ प्रवाशांची वाहतूक एव्हढेच मर्यादित नसून एसटीने सातत्याने सामाजिक बांधिलकी जपली आहे. राज्यावर आलेल्या भूकंप, दुष्काळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीत एसटीने नेहमीच मदतीचा हात पुढे केला आहे. मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात राहता यावे यासाठी एसटीने पुढाकार घेत प्रवासात सवलती दिल्या आहेत. खेड्यापासून शाळा कॉलेजमध्ये जाण्यासाठी विद्यार्थ्यांचे हक्काचे वाहन म्हणजे एसटीच. ग्रामीण भागातील करोडो विद्यार्थ्यांचे शिक्षण केवळ एसटीमुळेच पूर्ण होऊ शकले. म्हणूनच राज्यातील करोडो प्रवाशांच्या मनात एसटी विषयी आदराची भावना आहे. एसटी म्हणजे ग्रामीण भागासाठी वरदानच आहे. ग्रामीण भागात आजही एसटी हेच दळणवळणाचे प्रमुख साधन आहे. जनतेचा प्रवास सुखकर व्हावा, प्रवाशांना तत्पर आणि वक्तशीर सेवा मिळावी यासाठी एसटीचे कर्मचारी झटत असतात पण गेल्या काही वर्षापासून एसटी महामंडळ तोट्यात असल्याने एसटी कर्मचाऱ्यांचे भवितव्य अंधकारात बुडाले आहे. गेल्या अनेक वर्षापासून एसटी महामंडळ तोट्यात आहे त्यामुळे महामंडळाने नवीन कर्मचाऱ्यांची भरती केलेली नाही. कंत्राटी पदे भरून एसटीचे खाजगीकरण करण्याचा अट्टाहास केला जात आहे त्यामुळे कर्मचारी आणि महामंडळ यांच्यातील वाद विकोपाला गेला आहे या वादात प्रवाशी मात्र भरडले जात आहेत म्हणूनच सरकारने एसटीच्या खाजगिकरणाचा अट्टाहास सोडून एसटीला सशक्त करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. कंत्राटी ऐवजी कायमस्वरूपी कर्मचारी नेमून त्यांना इतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन आणि सुविधा दिल्यास महामंडळाला पुन्हा सुगीचे दिवस येतील. प्रवाशांच्या मनात एसटी विषयी आपुलकीची आणि आदराची भावना आहे. सरकारनेही एसटी कडे आपुलकीने पाहिल्यास एसटीला पुन्हा गतवैभव प्राप्त होईल. राज्यातील प्रवाशांच्या मनात मानाचे स्थान असलेल्या आणि सर्वांच्या लाडक्या लालपरीला म्हणजेच एसटीला ७८ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## वाढदिवस विशेष

# प्रभाग क्रमांक चारच्या विकासपर्वाचा आश्वासक दीपस्तंभ.. मा. नगरसेवक मुस्ताक शेख




राजकारणामध्ये काही व्यक्ती अशा असतात की एखाद्या मिळालेल्या संधीला त्या पुरेपूर न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतात. मुळात मिळालेले पद हे सर्वसामान्यांची सेवा करण्यासाठी व मूलभूत सोयी सुविधा आणि सर्वसामान्यांच्या हिताचे निर्णय घेऊन विकासाचे अपेक्षित टप्पा गाठण्यासाठी असते ही बाब ओळखून विकासाची खूणगाठ मनाशी पक्की बांधलेले मोहोळ नगरपरिषदेचे कर्तव्यदक्ष कार्यसम्राट दक्ष मा. नगरसेवक मुस्ताक शेख यांचा यांचा आज वाढदिवस..

आदरणीय मुस्ताक साहेब यांच्याबद्दल आज वाढदिनी काय लिहावं? हा प्रश्न पडणं साहजिक आहे. कारण इतकं हरहुन्नरी आणि बहुआयामी व्यक्तिमत्व असलेले साहेब अल्पावधीतच प्रभाग आणि शहरातच्या जनतेत लोकप्रिय झाले ते मनमिळावू स्वभावामुळेच. रस्ते, पाणी, आरोग्य, वीज प्रशासन या सर्वच बाबीबाबत सतत प्रशासनाकडे आग्रही असलेलं एक दिलखुलास व्यक्तिमत्त्व म्हणजे नगरसेवक मुस्ताक साहेब.

राजकीय क्षेत्रात पदार्पण केल्यापासून आजतागायत कधीही त्यांनी कोणावर कडवे टीकास्त्र सोडले नाही ना कधी आकस भावनेने कोणाला राजकारणात विरोध केला नाही. जे काही राजकारण केले आहे ते खेळीमेळीत आणि प्रांजळ भावनेने केले आहे. त्यामुळे संपूर्ण शहराच्या राजकारणात एक सर्वसमावेशक आणि मनमिळाऊ व्यक्तिमत्व म्हणून ते परिचित आहेत. ज्येष्ठ नेते महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष ना. राजन पाटील, माजी आमदार यशवंत माने, माजी. जि.प सदस्य शहाजान शेख, लोकनेतेच शुगरचे चेअरमन बाळराजे पाटील, सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील यांच्या माध्यमातून या प्रभागात जास्तीत जास्त निधी खेचून आणण्यामध्ये मुस्ताक शेख आणि त्यांचे सहकारी असलेले उपनगराध्यक्ष दत्ताअण्णा खवळे यांचा मोठा वाटा आहे. भागातील विकास कामासंदर्भात वीज रस्ते पाणी या समस्या सोडवण्यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांची समन्वय व संपर्क साधत जनतेच्या मनामध्ये दिलासा निर्माण केला.

दहा वर्षापूर्वीचा त्यांचा प्रभाग आणि सध्याचा प्रगत आणि अत्याधुनिक सोयी सुविधांनी संपन्न असलेला प्रभाग यामध्ये अमुलाग्र बदल करण्याचे श्रेय त्यांनाच जाते. कारण त्यांनी महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष ना. राजन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली माजी आमदार यशवंत माने यांच्या सहकार्याने खेचून आणलेल्या निधीतूनच हे विकासाचे स्वप्न साकार होऊ शकले आहे. केवळ विरोध करून आणि टीकाटीपणी करून प्रभागाचा विकास साध्य करता येत नाही. त्यासाठी धडपड आणि हातोटी कायम ठेवावी लागते हे मुश्ताक शेख यांच्या कार्यपद्धतीने तिथून प्रत्येक कार्यकर्त्याने शिकायला हवे. ह्या केलेल्या विकास कामाची दखल घेत प्रभागातील जनतेने मुस्ताक शेख यांच्या पत्नी शाहिस्ता परवीन मुस्ताक शेख यांना रोमहर्षक विजय मिळवून दिला.

प्रभागात विकासाचा महत्वाचा टप्पा पूर्ण करून मतदारसंघातील सर्वसामान्य जनतेचे विकासाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अहोरात्र झटत असलेल्या या दक्ष लोकप्रतिनिधी असलेल्या मनमिळवु नेत्यास म्हणजे मा. नगरसेवक मुस्ताक साहेब शेख यांना वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा...

शहराच्या पूर्वेकडील भागाच्या विकासात्मक वाटचालीचे यश भाजपचे ज्येष्ठ नेते माजी आमदार राजन पाटील आणि माजी आमदार यशवंत तात्या माने यांच्या मार्गदर्शक नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या नगरसेवक मुस्ताक शेख आणि उपनगराध्यक्ष दत्तात्रय खवळे यांना जाते. आजवर प्रभागातून त्यांना अनेकांनी केवळ त्यांची राजकीय प्रतिभा आणि अजातशत्रुता पाहून आकस भावनेने विरोध केला. मात्र त्यांनी स्वतः कधीही कोणाला व्यक्तिशः विरोध केला नाही. द्वेषभावनेचे राजकारण न करता प्रत्येकाच्या अंतकरणात आपुलकी आणि जिव्हाळ्याने सामावण्याची किमया साध्य केलेल्या या माणुसकीच्या शिलेदाराचे राजकारण बऱ्याचदा संपवण्याचे प्रयत्नही झाले मात्र ते सर्वसामान्यांच्या आशीवार्दाने अपयशी ठरले. त्यांची काम करण्याची पद्धत आणि विरोधक असो अथवा पक्षातला प्रत्येकाला समान वागणूक देण्याची त्यांची कार्यशैली त्यांना आजपर्यंतच्या राजकारणामध्ये यशस्वी बनवताना दिसून आली. म्हणूनच जनतेने पुन्हा या प्रभागाची प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिली. आणि या प्रभागात साहेबच सबकुछ असल्याचे जाणून दिले.

शब्दांकन
**साहिल शेख**
प्रतिनिधी मोहोळ
दैनिक कटूसत्य

# राज्यात पुढील दोन दिवस वादळी पाऊस, मेघगर्जना आणि गारपिटीचा इशारा

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील वातावरणात वेगाने बदल होत असून, पुढील दोन दिवस राज्यातील विविध भागांत वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता असून काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तविली आहे.

हवामानशास्त्र विभागाने दिलेल्या माहितीनुसार, धुळे, नाशिक जिल्ह्याचा घाटमाथा तसेच विदर्भातील भंडारा आणि गोंदिया या जिल्ह्यांत वादळी वाऱ्यासह गारपीट होण्याची शक्यता आहे. पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, नंदुरबार, जळगाव, अहिल्यानगर, पुणे, सातारा, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड आणि विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांत मेघगर्जनेसह हलक्या पावसाची शक्यता आहे. त्यामुळे या जिल्ह्यांना 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. पुणे शहर आणि परिसरात रविवारी (ता. ३१) ३७ अंश सेल्सिअस कमाल, तर २५.४ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद करण्यात आली.

पुढील दोन दिवस हवामान स्थिर राहणार असल्याची शक्यता आहे. सोमवारी (ता. १) कमाल आणि किमान तापमान स्थिर राहण्याची शक्यता आहे. कमाल तापमान ३७ अंश सेल्सिअस, तर २५ अंश सेल्सिअस इतके किमान तापमान नोंदविले जाण्याची शक्यता आहे.

# धनगर समाजाचा वनवास संपणार - हेमंत पाटील



**पुणे, (कटूसत्य वृत्त):-** केवळ एका छोट्या तांत्रिक चुकीमुळे गेल्या अनेक दशकांपासून आपल्या हक्काच्या आरक्षणापासून वंचित राहिलेल्या धनगर समाजाला आता लवकरच न्याय मिळणार आहे. सर्वोच्च न्यायालयातील न्यायालयीन लढा अत्यंत सकारात्मक आणि अंतिम टप्प्यात आला असून, येत्या काही दिवसांतच धनगर आरक्षणाची ऐतिहासिक अंमलबजावणी होईल, असा ठाम विश्वास 'भारत अगेन्स्ट करप्शन'चे राष्ट्रीय अध्यक्ष हेमंत पाटील यांनी व्यक्त केला. हिंदूधर्म रक्षक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त पुण्यात एका भव्य जयंती उत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात उपस्थितांना संबोधित करताना हेमंत पाटील बोलत होते.

सदगुरू सोसायटी मित्र परिवार, यशवंत बहुद्देशीय विकास संस्था, महाराष्ट्र राज्य धनगर समाज उन्नती मंडळ (चिपळूण) तसेच पुणे शहर धनगर समाजाच्या संयुक्त विद्यमाने शिंदे पूल, शिवणे येथील सदगुरू सोसायटी परिसरात पार पडलेल्या या कार्यक्रमाला होळकर राजघराण्याचे वंशज श्रीमंत अभिमन्युराजे होळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

धनगर समाजाची सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती आज कशी आहे, हे आपल्या सर्वांना ठाऊक आहे. आपल्या हक्कासाठी गेल्या दोन दशकांपासून आपण तीव्र आंदोलन केले. या प्रवासात समाजबांधवांनी कारागृह सोसले, पोलिसांच्या लाठ्या काठ्या खाल्ल्या. आरक्षणाच्या कायदेशीर लढ्यासाठी आम्ही उच्च न्यायालयात गेलो, मात्र तिथे याचिका फेटाळली गेली. या अपयशाने खचून न जाता आम्ही सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले.

या प्रदीर्घ संघर्षाच्या काळात अनेक राजकीय आणि सामाजिक प्रलोभने समोर आली, परंतु धनगर समाज आणि त्यांचे नेतृत्व कोणत्याही प्रलोभनांना बळी पडले नाही. आरक्षणाचा मूळ प्रश्न अद्याप सुटलेला नसला तरी, सर्वोच्च न्यायालयातील सध्या सुरू असलेली सुनावणी अंतिम टप्प्यात असून त्याचा निकाल धनगर बांधवांसाठी पूर्णपणे सकारात्मक लागेल. त्यामुळे प्रदीर्घ प्रतिक्षेनंतर आता अंमलबजावणीचा सुवर्णक्षण जवळ आला आहे, असे पाटील म्हणाले.

या कार्यक्रमाला पुणे शहर आणि परिसरातील धनगर समाजातील नागरिक, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत, आरक्षणाचा हा लढा आता विजयाच्या उंबरठ्यावर पोहोचल्याची भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

पान १ वरून

# अभिजित दीपके भारतात येणार...

**सीजेपी हे एक राजकीय आणि सामाजिक व्यंगचित्र**

सीजेपी हा राजकीय आणि सामाजिक व्यंगचित्रांवर आधारित एक उपक्रम आहे. जर काही पोस्ट आक्षेपार्ह असतील, तर फक्त त्याच ब्लॉक केल्या जाऊ शकतात. संपूर्ण खाते बंद करणे योग्य नाही. यापूर्वी अशा प्रकरणांमध्ये न्यायालयांनी दिलासा दिला आहे आणि काही खाती पुनर्संचयित केली आहेत. सध्या केवळ नोटीस बजावली जाऊ शकते. या प्रकरणातील कायदा अजून प्राथमिक अवस्थेत आहे. ब्लॉकिंग आदेशामागील कारण अद्याप स्पष्ट नाही. याचिकाकर्त्याने किंवा न्यायालयानेही ब्लॉकिंग आदेश पाहिलेला नाही.

सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सांगितले की, मध्यस्थ याचिकाकर्त्याला मदत करत असल्याचे दिसते. सरकारची बाजू ऐकल्याशिवाय कोणताही आदेश पारित करू नये. आवश्यक असल्यास, ब्लॉक करण्याचा आदेश आणि संपूर्ण रेकॉर्ड न्यायालयासमोर सादर केला जाऊ शकतो. राष्ट्रीय सुरक्षेचे कारण सांगून सीजेपीचे एक्स हँडल ब्लॉक करणाऱ्या सरकारी आदेशाला दीपकने आव्हान दिले आहे. ही याचिका ॲडव्होकेट नकुल गांधी यांनी दाखल केली होती. वृत्तानुसार, इंटेलिजन्स ब्युरो (IB) कडून मिळालेल्या माहितीच्या आधारे, केंद्र सरकारने राष्ट्रीय सुरक्षेच्या कारणास्तव कारवाई केली. यानंतर, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने एक्सला माहिती तंत्रज्ञान कायदा, 2000 च्या कलम 69अ अंतर्गत खाते ब्लॉक करण्याचे निर्देश दिले.

# विधान परिषद निवडणूक 2026 : पहिल्याच दिवशी 13 उमेदवारी अर्ज दाखल

**सोलापूर,(कटूसत्य वृत्त):-** विधान परिषद स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ द्विवार्षिक निवडणूक 2026 साठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्यास सुरुवात झाली असून पहिल्याच दिवशी एकूण 13 उमेदवारी अर्ज प्राप्त झाले आहेत.

भारतीय जनता पक्षाकडून सर्वाधिक 4 अर्ज, तर न्यू राष्ट्रीय समाज पार्टी, नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार), शिवसेना, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस यांच्याकडून प्रत्येकी 1 अर्ज दाखल करण्यात आला आहे. तसेच 4 अपक्ष उमेदवारांनी देखील उमेदवारी अर्ज सादर केले आहेत.

उमेदवारी अर्ज दाखल करणाऱ्या प्रमुख उमेदवारांमध्ये राजेंद्र राऊत, अशोक वाघमोडे, जीवन जानकर, वसंतराव दौलतराव देशमुख, महेश साठे, रमेश बारस्कर, नागेश अक्कलकोटे, आदित्य फत्तेपूरकर आणि धनंजय डिकोळे यांचा समावेश आहे. निवडणूक प्रक्रियेला सुरुवात झाल्याने राजकीय हालचालींना वेग आला आहे.



## वात्रटिका

**जिद्दी नेता**

रणरण उन्हात उपोषण,पण
चटका दुसऱ्याला बसला...
लपून बसलेला नेताजी पुन्हा
बडबडत माईकपुढं दिसला...
जात पात न बघता नेता अभ्यासा
चिकाटी त्याची, त्याचा हेका...
पुढारपण करणाऱ्यानो जरा
नावे ठेवण्यापेक्षा जिद्द शिका...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी गौरी घोरपडेची अथक मेहनत; संघर्षातून गाठले यशाचे शिखर

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** "वाढ गं माय... सुया घ्या, बिबे घ्या..." अशी हाक देत गावोगावी फिरून संसाराचा गाडा हाकणाऱ्या आईची लेक आज मुंबई शहर पोलिस दलात महिला पोलिस हवालदार म्हणून निवड झाली आहे. मुळची परांडा येथील व सध्या टेंभुर्णी (ता. माढा) येथे वास्तव्यास असलेल्या वैद्य समाजातील कु. गौरी सुभाष घोरपडे हिने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत हे यश संपादन केले आहे. तिच्या यशामुळे संपूर्ण परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

महाराष्ट्रातील विविध समाजघटकांनी आपल्या पारंपरिक व्यवसायातून स्वतंत्र ओळख निर्माण केली. वैद्य समाजातील अनेक कुटुंबांची उपजीविका गावोगावी फिरून घरगुती वस्तू विकण्यावर अवलंबून होती. "वाढ गं माय... सुया घ्या, बिबे घ्या..." अशी हाक देत महिलांनी संसार उभा केला. अशाच कष्टकरी कुटुंबात जन्मलेल्या गौरीने आज पोलिस दलात भरारी घेत आपल्या समाजाचे नाव उज्ज्वल केले आहे.

गौरीचे बालपण अत्यंत संघर्षमय परिस्थितीत गेले. राहण्यासाठी पक्के घर नव्हते. पालात राहूनच तिने बालपण अनुभवले. घरात वीज नव्हती, पंखा नव्हता, अनेक मूलभूत सुविधांचा अभाव होता.तीने राहत्या पालामध्ये चिमणी चा दिवा लावून व खंदिलाच्या प्रकाशात अभ्यास केला मात्र शिक्षणाची जिद्द आणि काहीतरी मोठे करण्याची उमेद तिच्या मनात कायम होती.

तिचे वडील सुभाष घोरपडे हे पत्र्याच्या डब्यांच्या वस्तू, चाळण्या व इतर साहित्य तयार करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. तर आई ताई सुभाष घोरपडे आजही पहाटेपासून डोक्यावर टोपली घेऊन गावोगावी फिरत सुया, बिबे, पोत, गंगावणे, आरसे, फण्या, नाकातले, कानातले तसेच महिलांच्या दैनंदिन वापरातील विविध वस्तू विकून संसाराला हातभार लावत आहेत.



गौरीचे भाऊ किशोर, कृष्णा आणि प्रकाश घोरपडे यांनीही बहिणीच्या शिक्षणासाठी मोठे योगदान दिले. कधी पानटपरी चालवून तर कधी टेंभुर्णी ते प्रसिद्ध असलेले चहाचे हॉटेल संत सावता माळी हॉटेलमध्ये काम करून त्यांनी बहिणीच्या शिक्षणाचा खर्च भागवला. बहिणीचे स्वप्न पूर्ण व्हावे यासाठी त्यांनी स्वतःच्या कष्टांची पर्वा केली नाही.

गौरीचे वडील शिक्षित नव्हते. मात्र "माझी मुलगी सायबीन व्हावी" हे त्यांचे मोठे स्वप्न होते. दुर्दैवाने त्यांच्या निधनानंतर हे स्वप्न अपूर्ण राहण्याची शक्यता निर्माण झाली होती. परंतु गौरीने हार न मानता वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्याचा निर्धार केला आणि त्यासाठी स्वतःला अभ्यास व पोलिस भरतीच्या तयारीत झोकून दिले.

तिने नववीपर्यंतचे शिक्षण सांगली जिल्ह्यातील एका गावात पूर्ण केले. दहावीचे शिक्षण टेंभुर्णी येथील सुनंदा विद्यालयात घेतले. अकरावी-बारावीचे शिक्षण जय तुळजाभवानी आश्रम शाळेत पूर्ण केले. त्यानंतर टेंभुर्णी येथील विठ्ठलराव शिंदे महाविद्यालयातून उच्च शिक्षण घेतले. पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण जेऊर येथील खासगी अकॅडमीत घेतले.

कठोर परिश्रम, नियमित सराव, शिस्तबद्ध जीवनशैली आणि प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर गौरीने नुकत्याच झालेल्या भरती प्रक्रियेत यश संपादन केले. तिची मुंबई शहर पोलिस दलात महिला पोलिस हवालदार पदावर निवड झाली आहे.

निवडीची आनंदवार्ता मिळाल्यानंतर गौरीने टेंभुर्णी शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज आणि क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या अर्धपुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

गौरीच्या निवडीची बातमी समजताच कुटुंबीय, नातेवाईक, मित्रमंडळी व समाजबांधवांनी गुलाल उधळून आनंदोत्सव साजरा केला. एकेकाळी पालात राहणारी, आईसोबत संघर्षाचे दिवस पाहणारी ही मुलगी आज पोलिसांची खाकी वर्दी परिधान करणार असल्याने सर्व स्तरांतून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

प्रतिकूल परिस्थिती, दारिद्र्य, अपुऱ्या सुविधा आणि अनेक अडथळ्यांवर मात करून गौरीने मिळवलेले हे यश अनेक तरुण-तरुणींसाठी प्रेरणादायी ठरत आहे. जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते, हे तिने आपल्या कर्तृत्वातून सिद्ध करून दाखवले आहे.

औचित्य साधून माजी कृषी पशुधन सभापती संजय पाटील भिमानगरकर यांनी टेंभुर्णी येऊन कुर्डूवाडी चौकामध्ये शाल श्रीफळ व फेटा बांधून गौरी घोरपडे हिचा सत्कार करण्यात आला.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य अण्णासाहेब ढाणे, शिवसेना तालुका उपप्रमुख सुरेश लोंढे, पत्रकार संतोष वाघमारे, आर पी आयचे यशपाल लोंढे, मराठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष अनिल जगताप, सोपान ढगे, सुरज देशमुख, श्रीकांत मासुळे, धनंजय मोरे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# अहिल्यादेवी होळकर यांचे प्रशासन व न्यायव्यवस्थेत उल्लेखनीय योगदान- मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या राज्यात शिक्षण, शेती, न्यायव्यवस्था व प्रशासन व्यवस्थेमध्ये उल्लेखनीय योगदान देऊन जनकल्याणाची महत्त्वपूर्ण कामे केली. म्हणून त्यांचे कार्य वंदनीय आहे असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था, अक्कलकोट संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने आयोजित केलेल्या अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, अहिल्यादेवींनी संस्कृत शिक्षणाला मोठे प्रोत्साहन दिले. वेद, पुराणे, धर्मशास्त्र आणि भारतीय संस्कृतीच्या अध्ययनासाठी त्यांनी विद्वानांना आश्रय दिला. अनेक पंडित, कवी आणि अभ्यासकांना त्यांनी आर्थिक मदत दिली.



धर्मशाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या राहण्याची आणि शिक्षणाची सोय केले.

शेतीच्या विकासासाठी त्यांनी विहिरी, तलाव, घाट आणि पाण्याच्या साठवणुकीची कामे केली. शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध व्हावे यासाठी नदीकाठांवर घाट आणि जलव्यवस्था उभारली. दुष्काळ व नैसर्गिक संकटांच्या काळात शेतकऱ्यांना करसवलत आणि आर्थिक मदत केली.

अहिल्यादेवींनी देशात अनेक ठिकाणी मंदिरे, घाट आणि धर्मशाळा बांधल्या. काशी विश्वनाथ मंदिराचा जीर्णोद्धार त्यांनी केला. तसेच सोमनाथ, गया, उज्जैन, नाशिक, अयोध्या व द्वारका अशा अनेक तीर्थक्षेत्रांचा विकास केला. प्रवाशांसाठी धर्मशाळा आणि अन्नछत्रांची व्यवस्था केली.

यावेळी बीए, बी काम भाग एक मध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची प्रक्रिया यानिमित्ताने सुरू करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्राध्यापिका हर्षदा गायकवाड यांनी केले आभार सिद्रामप्पा पाटील यांनी मानले कार्यक्रमास कुमार जाधव, नागिनी सुतार, जयश्री वाले उपस्थित होते.

**अहिल्यादेवी होळकर पुण्यश्लोक पदवीने सन्मानित**

अहिल्यादेवी होळकर यांनी न्यायव्यवस्था आणि प्रशासनात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल जनतेने त्यांना 'लोकमाता' आणि 'पुण्यश्लोक' पदवीने सन्मानित केले असे मल्लिनाथ कल्याणशेट्टी म्हणाले.

# कॉन्ट्रॅक्टर सतीश भोसले यांचे दुर्दैवी निधन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरातील प्रसिद्ध कॉन्ट्रॅक्टर आणि सामाजिक वर्तुळात मोठे नाव असलेले सतीश उद्धव भोसले (वय ५५, रा. जानकी नगर, जुळे सोलापूर) यांचे सोमवारी (१ जून) गोवा येथे पर्यटनादरम्यान दुर्दैवी आणि अकाली निधन झाले. या धक्कादायक घटनेमुळे सोलापूर महानगरपालिका वतुर्ळासह त्यांच्या मित्रपरिवारात मोठी हळहळ व्यक्त होत आहे. सतीश भोसले यांचे मावसभाऊ राहुल शिंदे यांनी या घटनेला दुजोरा दिला आहे.

**गोव्यात समुद्रकिनारी अपघात**

मिळालेल्या माहितीनुसार, सतीश भोसले हे आपल्या कुटुंबासह गोवा येथे पर्यटनासाठी गेले होते. सोमवारी समुद्रकिनाऱ्यावर फिरत असताना अचानक आलेल्या एका मोठ्या आणि जोरदार लाटेच्या तडाख्यामुळे ते समुद्राच्या किनाऱ्यावरील खडकावर आपटले. यात त्यांचा दुदैर्वी मृत्यू झाला.

मंगळवारी (२ जून) सोलापुरात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याचे त्यांच्या कुटुंबीयांकडून सांगण्यात आले.

**महापालिका वर्तुळ आणि व्यवसाय क्षेत्रात हळहळ**

सतीश भोसले हे सोलापूर महानगरपालिका (SMC) तसेच सार्वजनिक बांधकाम विभागात (PWD) एक नामांकित आणि परिचित कंत्राटदार म्हणून कार्यरत होते. गंगेवाडी येथे त्यांचा वाळू, मुरूम आणि इतर बांधकाम साहित्याचा मोठा व्यवसाय होता.



आपल्या कामातील प्रामाणिकपणा, मनमिळाऊ आणि शांत स्वभाव, तसेच धार्मिक प्रवृत्तीमुळे त्यांनी सोलापूरच्या व्यावसायिक आणि सामाजिक क्षेत्रात स्वतःचे एक वेगळे स्थान निर्माण केले होते.

**अनेकांचा जिवाभावाचा मित्र हरपला!**

एक प्रेमळ, संकटसमयी मदतीला धावून जाणारा आणि जिवाभावाचा माणूस गमावल्याची भावना सध्या सोलापूरकरांमधून व्यक्त होत आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांच्या मित्रांनी आणि हितचिंतकांनी सतीश भोसले यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, आई, भाऊ आणि बहीण असा मोठा परिवार आहे.

**ट्रेकिंग आणि भटकंतीची आवड**

सतीश भोसले हे नियमितपणे वॉकिंगला जायचे. स्मृतिवन उद्यान, नेहरू ग्राउंड यासह वेगवेगळ्या ठिकाणी ते सकाळी वॉकिंगला असायचे. त्यांना ट्रेकिंग आणि भटकंतीची आवड होती. हिंदवी परिवारासोबत त्यांनी अनेक ट्रेकिंग मोहिमा केल्या आहेत.

# राजमाता अहिल्याबाई होळकर जयंती उत्साहात संपन्न



**करमाळा, (कटूसत्य वृत्त):-** हिवरवाडी येथे राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त राजमाता ग्रुप हिवरवाडी यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेले विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडले. दोन दिवस चाललेल्या या जयंती उत्सवाला परिसरातील युवक, ग्रामस्थ व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

दि. ३० मे रोजी सकाळी ध्वजारोहण कार्यक्रमाने उत्सवाची सुरुवात झाली. त्यानंतर आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात ५३ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. तसेच नेत्र तपासणी शिबिरामध्ये ४७ नागरिकांची तपासणी करण्यात आली. या दोन्ही उपक्रमांना विशेषतः युवकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

सायंकाळी प्रा. डॉ. संजय चौधरी यांचे ह्रराजमाता अहिल्याबाई होळकर यांच्याकडून चालू पिढीने काय घ्यावेह्न या विषयावरील व्याख्यान संपन्न झाले. त्यांनी राजमाता अहिल्याबाई यांच्या कायार्चा आणि विचारांचा वारसा नव्या पिढीने आत्मसात करण्याची गरज व्यक्त केली. व्याख्यानानंतर स्नेह भोजनाचा कार्यक्रम पार पडला.

दि. ३१ मे रोजी सकाळी राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर सायंकाळी भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत युवक, महिला व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. शिवमुद्रा बँजो, एसके पेपर ब्लास्ट आणि आकर्षक सजावट यामुळे मिरवणुकीला विशेष रंगत आली.

सामाजिक उपक्रम, प्रेरणादायी व्याख्यान आणि भव्य मिरवणुकीमुळे हिवरवाडीतील राजमाता अहिल्याबाई होळकर जयंती उत्सव यंदा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांची सिंहगड केगाव कॅम्पसला सदिच्छा भेट

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शिवाजी विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू, डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटीचे माजी कुलगुरू तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्र शिक्षण विद्यापीठ लोणारे चे प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. रजनीश के कामत यांनी सिंहगड इन्स्टिट्यूट, केगाव (सोलापूर) येथे सदिच्छा भेट दिली. त्यांच्या भेटीमुळे संस्थेतील शिक्षक, अधिकारी आणि विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी सिंहगड केगाव-सोलापूर कॅम्पसचे डायरेक्टर संजय नवले यांनी पुष्पगुच्छ देऊन डॉ. कामत यांचे स्वागत केले. तसेच संस्थेच्या विविध शैक्षणिक, संशोधन आणि विद्यार्थी विकास उपक्रमांची माहिती त्यांना देण्यात आली. भेटीदरम्यान उच्च शिक्षणातील बदलते प्रवाह, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP-2020), संशोधनाला चालना, उद्योग-शिक्षण समन्वय, कौशल्याधारित शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांबाबत सविस्तर चर्चा झाली. डॉ. कामत यांनी विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील स्पर्धेसाठी सक्षम बनविण्यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण, नवोपक्रम आणि संशोधन यांना प्राधान्य देण्याची आवश्यकता अधोरेखित केली.



सिंहगड संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीचे कौतुक करताना त्यांनी ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या दर्जेदार संधी उपलब्ध करून देण्यात अशा संस्थांची भूमिका महत्त्वाची असल्याचे नमूद केले. तसेच आगामी काळात विद्यापीठ आणि शैक्षणिक संस्थांमधील समन्वय अधिक दृढ होण्याची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

या प्रसंगी संस्थेचे मुख्य पदाधिकारी, सदस्य यांची प्रमुख उपस्थिती होती. भेटीच्या शेवटी मान्यवरांनी कॅम्पसमधील विविध शैक्षणिक सुविधा, प्रयोगशाळा आणि विद्यार्थी-केंद्रित उपक्रमांची माहिती घेतली. डॉ. कामत यांच्या या सदिच्छा भेटीमुळे संस्थेच्या शैक्षणिक प्रगतीला नवी दिशा मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

## Classified - छोटी जाहीरात

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय
**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू




**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) आईची बहीण २) अंतराळ कक्षेतील वाहन ३) पाच गुणिले सहा ४) राष्ट्रवादीचे संस्थापक ५) शर्थ, नियम ६) नाकाने ओढतात ती तंबाखूची पूड ९) नगरपालिकेवर निवडून दिलेला लोकप्रतिनिधी १०) बंडखोर स्वभावाचे नेते-नारायण ** १२) दुर्ग, किल्ला १३) शिवकालीन लढाईची पध्दत-गनिमी ** १४) सणादिवशी करतात तो गोड खाद्यपदार्थ १५) भिंतीवरील सरपटणारा प्राणीजीव १७) दह्यापासून बनवितात ते पेय १८) छोटी चारचाकी प्रवासी गाडी २०) एखाद्याला वश करण्याचे उपाय-** ** ** भेद २१) हनुमानाच्या उपासनेचा वार २२) फलंदाजाने बनविलेल्या शंभर धावा २३) वस्तूंची संख्या २५) ध्यास, घेतला ** टाकू नये २६) वरल्या मनाने २८) भारतीय क्रिकेट टीमचे माजी प्रशिक्षक-** शास्त्री ३०) तरचा जोडीदार ३२) हस्त, कर ३३) कागदी चलन ३४) एक म्हण-*** जीव सदाशिव ३५) देवांचा राजा ३६) गती ३७) मुरली, बासरी ३८) तीन दुणे ३९) एक कडधान्य

**आडवे शब्द :** १) युपीच्या माजी महिला मुख्यमंत्री, बसपा सुप्रिमो ४) ऐंशीच्या दशकातील एक अभिनेता -*** सिन्हा ५) मुलाचे एक नाव ७) एक (इंग्रजीत) ८) उन्हाळा (इंग्रजीत) ९) बोल्टचा साथीदार ११) प्रवासाने होणारा त्रास १३) काकाची पत्नी १४) शनिवारवाडा या शहरात आहे १५) उडिदाच्या पिठापासून लाटून बनवितात ते १६) शासकीय कर्मचाऱ्यांचा सुट्टीचा दिवस १७) धातूचा बारीक तंतू १८) गोंधळ, गोंगाट १९) मनाने मजबूत २०) हळू, मंद गतीने २३) मीठ (हिंदीत) २४) चंद्रावर पहिले पाऊल ठेवणारा अंतराळवीर-** आर्मस्ट्राँग २५) उन्हाळ्यात वादळी वाऱ्यासह पडणारा पाऊस २७) बजरंगबलीच्या हातातील आयुध २८) याच्यापासून शिरा बनवितात २९) परीट, धोबी ३१) एक थोर जैन संत ३३) गुलाम, सेवक ३४) श्रीगणेशाचे एक नाव ३६) हॉटेलमधील सेवक ३७) पाकिस्तान संक्षिप्तमध्ये असे लिहितात ३८) सागर, दर्या ४०) एक द्विदल कडधान्य ४१) स्वस्तच्या विरूध्दार्थी

## सुडोकु - 266

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | | 1 | | | 3 | 9 | | 6 |
| | | 9 | | | 7 | 8 | 5 | |
| 2 | 5 | | 1 | | | 4 | 7 | |
| 5 | | | | 6 | 1 | 7 | | 4 |
| 7 | 6 | | 8 | 3 | | | | |
| | 3 | 2 | | | | | | |
| | 2 | | | 1 | 9 | 5 | | |
| | | 5 | | | | 3 | | 2 |
| | | | 4 | 5 | 2 | 1 | 9 | 7 |

# रविवार 28 जून रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचे आयोजन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** 0 ते 5 वर्षे वयोगटातील सर्व बालकांना तोंडावाटे दोन थेंब पाजून ही लस देण्यात येणार आहे. सोलापूर शहरात अंदाजे एक लाख सहा हजार बालकांना एकूण 373 लसीकरण केंद्रांमधून ही लस देण्यात येणार असून त्याकरिता एकूण 1160 आरोग्य कर्मचारी तैनात करण्यात येणार आहेत.

याकरिता सोलापूर मनपा अतिरिक्त आयुक्त मा. वीणा पवार यांच्या अध्यक्षतेखाली city task force मीटिंग आयोजित करण्यात आली होती. या बैठकीकरिता सर्व सहयोगी संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या बैठकीदरम्यान मा अतिरिक्त आयुक्त यांनी सोलापूर मनपा आरोग्य विभागाच्या वतीने केलेल्या तयारीचा आढावा घेतला तसेच सदर मोहिमेच्या यशस्वितेसाठी व्यापक प्रमाणात जन जागृती करणेबाबत सूचना केल्या.

शहरातील विविध शाळांमधून पालकांना या मोहिमेबद्दल अवगत करण्याचे निर्देश यावेळी माननीयांनी शिक्षण विभागाला दिले. शहरातील सर्व लॉज मधून वास्तव्यास असणाऱ्या पात्र लाभार्थ्यांचे लसीकरण प्राधान्याने करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

मनपा आरोग्य खाते, शिक्षण खाते, ICDS, खाजगी वैद्यकीय व्यावसायिक यांनी एकत्रित प्रयत्न करून 100% उद्दिष्ट पूर्ती करण्याचे आवाहन याप्रसंगी त्यांनी केले.

सदर बैठकीस आरोग्याधिकारी डॉ राखी माने, महापालिकेच्या माता बाल संगोपन अधिकारी डॉ मंजिरी कुलकर्णी, मनपा चे माहिती व जनसंपर्क अधिकारी अजित खानसोळे, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाकडे डॉ, संतोष जोगदंड, डॉ रोहन वायचळ, जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयाकडून डॉ पाटील, जिल्हा माता बाल संरक्षण अधिकारी अविनाश मगर, डॉ वैशंपायन स्मृति शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथील प्रतिनिधी यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# सोलापूरातील खासगी रुग्णालयांमध्ये बोगस नर्सचा सुळसुळाट

## रुग्णांच्या जीवाशी खेळणाऱ्या रुग्णालयांवर कारवाई करा – छावा संघटना




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** शहर व जिल्ह्यातील अनेक खासगी रुग्णालयांमध्ये कोणतेही अधिकृत नर्सिंग शिक्षण अथवा महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी नसलेल्या महिलांना "नर्स" व "सिस्टर" म्हणून नियुक्त करून रुग्णांच्या जीवाशी खेळ केला जात असल्याचा गंभीर आरोप राष्ट्रीय छावा संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष अ‍ॅड. योगेश पवार यांनी केला आहे.

यासंदर्भात जिल्हाधिकारी, सिव्हिल सर्जन व महानगरपालिका आरोग्य विभागाकडे लेखी तक्रार दाखल करण्यात आली असून जिल्हाभरातील खासगी रुग्णालयांची तातडीने तपासणी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तक्रारीनुसार, नर्सिंग व्यवसायासाठी ANM, GNM, B.Sc. Nursing किंवा Post Basic B.Sc. Nursing यांसारखी शैक्षणिक पात्रता आणि महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलमध्ये नोंदणी बंधनकारक असतानाही अनेक रुग्णालयांमध्ये अपात्र महिलांकडून इंजेक्शन देणे, सलाईन लावणे, ड्रेसिंग करणे तसेच औषधोपचाराशी संबंधित धोकादायक कामे करून घेतली जात आहेत.

प्रशिक्षित नर्सला किमान 10,000 ते 25,000 रुपये वेतन द्यावे लागत असल्याने काही खासगी रुग्णालये कमी खर्चासाठी अप्रशिक्षित महिलांना 7,000 ते 8,000 रुपयांमध्ये नोकरीवर ठेवत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या प्रकारामुळे गंभीर वैद्यकीय चुका होण्याचा व रुग्णांच्या जीवितास धोका निर्माण होण्याचा संभव आहे.

राष्ट्रीय छावा संघटनेचे अ‍ॅड. योगेश पवार यांनी प्रशासनाला 15 दिवसांचा अवधी दिला असून या कालावधीत तपासणी व कारवाई सुरू न झाल्यास सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक खासगी रुग्णालयासमोर जनआंदोलन छेडण्यात येईल तसेच बोगस नर्स ठेवणाऱ्या रुग्णालयांची नावे जनतेसमोर व सोशल मीडियावर जाहीर करण्यात येतील, असा इशाराही देण्यात आला आहे.

# श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने पत्रमहर्षी रंगाअण्णा वैद्य यांना अभिवादन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने पत्रमहर्षी रंगाअण्णा वैद्य यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थितांनी आदरांजली वाहिली.

यावेळी माजी आमदार संजयमामा शिंदे, माजी आमदार राम सातपुते, माजी आमदार यशवंत माने, सोलापूर जिल्हा सहकारी दूध संघाचे उपाध्यक्ष दीपक माळी, जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती शिवाजीराव कांबळे, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, खजिनदार किरण बनसोडे, ज्येष्ठ पत्रकार पुरुषोत्तम कुलकर्णी, अविनाश कुलकर्णी, पत्रकार अरुण बारस्कर आदींसह पदाधिकारी, सदस्य तसेच पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थितांनी ज्येष्ठ पत्रकार पुरुषोत्तम कुलकर्णी, किरण बनसोडे यांनी पत्र महर्षी रंगाअण्णा वैद्य यांच्या कार्याचे स्मरण करून त्यांच्या कायार्ला अभिवादन केले. याप्रसंगी मान्यवरांनी रंगाअण्णा वैद्य यांनी पत्रकारिता क्षेत्रात दिलेल्या योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. पत्रकारितेतील त्यांची निष्ठा, सामाजिक बांधिलकी आणि निर्भीड लेखन आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. त्यांच्या विचारांचा वारसा जपणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, अशी भावना मनोगतात मान्यवरांनी व्यक्त केली.

# अकलूज गुदमरतंय, त्याला हवा मोकळा श्वास!



**अकलूज (विलास गायकवाड):–** तत्कालीन अकलूज ग्रामपंचायतीने, ठराव मंजूर करून, अकलूज परिसरातील सरकारी जागेत, रस्त्याच्या कडेला, किरकोळ व्यावसायिकांनी केलेले अतिक्रमण हटाव मोहिम राबवून, अकलूजच्या खऱ्या सौंदर्याचा विहंगम, विस्तीर्ण असा चेहरा दाखवत, खऱ्या सौंदर्याचे दर्शन घडविले होते.

कालांतराने हे सौंदर्य जास्त दिवस टिकले नाही. या सौंदर्यावर काही स्वार्थी आणि कुप्रवृत्तीच्या मानसिकतेने,पुन्हा मटका टपऱ्या, पान टपऱ्या, वडापाव गाडे, भेळीचे गाडे, अंडा आम्लेट गाडी, कपडे विक्री दुकाने, चहा गाडे असे किरकोळ व्यावसाय टाकून, अकलूजच्या सौंदर्यावर अतिक्रमणाचा घाला घालत, अत्याचार केला आहे. याकडेही अकलूज नगरपरिषदेने व सार्वजनिक बांधकाम विभागाने लक्ष वेधून, गुदमरणाऱ्या अकलूजला मोकळा श्वास घेण्यासाठी प्रयत्न करावा अशी मागणी अकलूज मधून होताना दिसत आहे.

अकलूज शहरातील मानाचा तुरा समजला जाणारा गांधी चौक, पासून ते शहराची शान असणारे जुने बसस्थानक पर्यंत अतिक्रमणवीरांनी, अतिक्रमणाचे आक्रमण करून जाळे पसरवले आहे.आशिया खंडात कर्तुत्वाचा आलेख उंचावत ठेवत, अखंड आकाश कवेत घेणाऱ्या,अकलूज शहराने जनमाणसांत, कौतुकाचा ठसा उमटवला आहे. अकलाई देवीच्या सानिध्यात आणि नीरा नदीच्या तीरावर, स्वावलंबी आणि स्वाभिमानाने वसलेले हे गाव, राजकीय पटलावरही अत्यंत बलवान समजले जाते आणि यास कारणीभूत या मागची महाशक्ती म्हणजे महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील.

महाराष्ट्र राज्याचा विकास करीत असताना, विजयसिंह मोहिते पाटील यांनी, स्वतःच्या अकलूज गावाकडे कधीही दुर्लक्ष केले नाही. राज्याच्या विकासाबरोबरच अकलूज गावच्या सौंदर्यात भर घालत राहीले. अकलूज येथील उद्योगधंदे आणि वाढती लोकसंख्या याचा विचार करून, विजयसिंह मोहिते पाटील यांनी बायपास रस्ते बनवले.यामुळे गावाच्या मध्यभागी होणारी वाहतुकीची कोंडी थांबली गेली.कालांतराने मोठा संघर्ष करत, अकलूज नगरपरिषदेची स्थापना झाली. अकलूज नगरपरिषदेकडून जनतेच्या खूप अपेक्षा वाढल्या गेल्या,परंतु नगरपरिषदेकडून जनतेच्या अपेक्षाचां भंग झाला होता. येवढेच नाहीतर अकलूज गावच्या विविध प्रकारच्या समस्यांचे साम्राज्य निर्माण झाले होते. नगरपरिषद स्थापने पासून चार, पाच वर्षे अकलूज नगरपरिषदेवर प्रशासकच अधिराज्य गाजवत होते. अकलूज ग्रामपंचायत असताना मोठ्या कष्टाने, अकलूज मधील वाढत्या अतिक्रमणांना पूर्णविराम मिळाला होता. आता पुनश्च अकलूज गावात अतिक्रमणाची दाहकता वाढली आहे.अकलूज गावातील अत्यंत महत्त्वाचा समजला जाणारा, गांधी चौक येथे पुन्हा सरकारी जागेत झालेले अतिक्रमण वाहतुकीची कोंडी निर्माण करू लागले आहे. याकडे अकलूज नगरपरिषदेने दुर्लक्ष करू नये, तसेच महावितरण कार्यालयाच्या बाहेर झालेले अतिक्रमण, उपजिल्हा रुग्णालयाच्या बाजूला झालेले अतिक्रमण, जुने बस स्थानकाच्या बाहेर झालेले अतिक्रमण,नवीन बसस्थानक परिसराच्या बाहेर झालेले अतिक्रमण हे कोणाच्या अधीन, अंतर्गत आणि नियंत्रणाखाली येतात, त्यांनी याकडे लक्ष केंद्रित करून, गुदमरणाऱ्या अकलूजला, मोकळा श्वास देऊन, अतिक्रमण मुक्त करावे अशी मागणी सुज्ञ नागरिक करत आहेत.

# विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करावे- अ‍ॅड. अविनाश काले



**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** अकलूज येथील ताहेरा फाउंडेशन ही सर्व जाती धर्माच्या समाजाच्या लोकांच्या उन्नतीसाठी कार्य करणारी सामाजिक ट्रस्ट असून तिच्या वेगवेगळ्या उपक्रमाबद्दल राजकीय समीक्षक, प्रसिद्ध वक्ते, अ‍ॅड.अविनाश काले यांनी गौरव उदगार काढले. अ‍ॅड. काले यांनी विद्यार्थी व पालकांना वेगवेगळी उदाहरणे सांगत स्वतःच्या जीवनामध्ये एक ध्येय समोर ठेवून यशासाठी परिश्रम करण्याचे आवाहन केले. काले यांचे मनापासून चे विविध उदाहरणे व दाखले दिल्याने बोलणे उपस्थित विद्यार्थी व पालकांच्या मनात नक्कीच घर करून राहिले. सालाबाद प्रमाणे दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून अ‍ॅड.अविनाश काले उपस्थित होते.या प्रसंगी अकलूज नगरपरिषदेच्या नगरसेविका सौ नम्रताताई जगताप उपस्थित होत्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला इलाही बागवान यांनी कार्यक्रमाचे स्वरूपाची मांडणी करताना ताहेरा फाउंडेशनच्या विविध उपक्रमाची ओळख उपस्थित पाहुणे व पालकांना करून दिली.ताहेरा फाउंडेशनचे अध्यक्ष हाजी अबुबकरभाई तांबोळी यांनी प्रस्ताविकात माणसाच्या जीवनात शिक्षणाला अनन्य साधारण महत्त्व असल्याचे सांगून ताहेरा फाउंडेशनच्या वतीने शैक्षणिक कार्यात जाणीवपूर्वक लक्ष देण्याचा आवर्जून उल्लेख केला.या कार्यक्रमात दहावी बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांना ताहेरा फाउंडेशनच्या वतीने शैक्षणिक साहित्य ठेवण्यासाठी सुंदर सॅक भेटवस्तू म्हणून देण्यात आली. दहावी–बारावीच्या अरबाज बागवान, रिदा शेख,मुस्कान बागवान, अलमास मकानदार, मुजमिल तांबोळी,मोहसीन तांबोळी, उबेद आतार, अली अकबर मकानदार, जवेरिया तांबोळी या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव मान्यवरांच्या शुभहस्ते भेटवस्तू देऊन करण्यात आला.

पंचवटी–अकलूज येथील मुंबई पोलीस दलात निवड झालेल्या गायत्री क्षीरसागर हिचा विशेष सन्मान हाजी अबुबकरभाई तांबोळी व खजिनदार हाजी असलम तांबोळी यांच्या हस्ते करण्यात आला. सदर कार्यक्रमात गायत्री क्षीरसागर यांच्या पालकांनाही त्यांच्या योगदानासाठी सन्मानित करण्यात आले.सदर कार्यक्रमासाठी हाजानीमा शाफिया तांबोळी, खजिनदार हाजी असलमभाई तांबोळी, हजानीमा जुबेदा तांबोळी, साजिद सय्यद, भैया माडेकर, मेंबर दादाभाई तांबोळी, इंजिनीयर सरफराज तांबोळी, युनूस मुलाणी, मेंबर जावेद बागवान, शकील मुलाणी सर, छोटा जावेदभाई बागवान, नाझीम खान रत्नाई पार्कमधील प्रतिष्ठित नागरिक कार्यक्रमासाठी उपस्थित होते.या कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांना पाठीवर साहित्य ठेवण्यासाठी दिलेली सॅक ही कायमची पाठीवर शाब्बासकीची थाप असल्याची भावना नागरिकांच्या वतीने व्यक्त करण्यात येत होती.

# न्यासाकडून राबविण्यात येत असलेले उपक्रम हे दिशा देणारे – बाबासाहेब पाटील




**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):–** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली धार्मिक क्षेत्रातील समृद्ध परंपरा, न्यास जपत असून, राबविण्यात येत असलेले उपक्रम हे दिशा देणारे आहे. हे कार्य पाहून समाधान होत असल्याचे मनोगत राज्याचे सहकारमंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त केले.

ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे आले असता न्यासाचे सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, कृपावस्त्र, श्रीफळ व छत्रपती शिवाजी महाराजांची रेखीव, सुंदर प्रतिमा देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी ना. बाबासाहेब पाटील हे बोलत होते. त्यांच्या समवेत जिल्हा बँकेचे प्रशासक कुंदन भोळे, ना. पाटील यांचे स्वीयसहायक धनंजय जाधव, कोंडीबा पडोळे, उत्तर पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दीपक भीतडे, सहायक निबंधक राहुल ठोंबरे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष दिलीप सिद्धे, वृद्रय्या स्वामी, अनिल मडके, अर्जुनराव खोडवे, सुधाकर पाटील, महेश स्वामी, नितीन मळे, संजय पाटील, शांतय्या स्वामी, पोलीस नाईक ढेंगळे हे उपस्थित होते.

याप्रसंगी मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, सौरभ मोरे, दत्ता माने, विजय माने, शुभम सावंत, लक्ष्मण बिराजदार, राजू पवार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, अनिल बिराजदार, मल्लिकार्जुन गवळी, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी, राहुल इंडे यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# सोलापूर बस स्थानकात हाउस कीपिंग व मेकॅनिजड बस वॉशिंग प्रकल्पाचा शुभारंभ



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (MSRTC) 78 व्या वर्धापन दिनानिमित्त दिनांक 01 जून 2026 रोजी सोलापूर बसस्थानक येथे Smart Services Pvt. Ltd. मार्फत Housekeeping व Mechanized Bus Washing या नव्या प्रकल्पाचा उद्घाटन व शुभारंभ समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात आणि मान्यवरांच्या उपस्थितीत यशस्वीरित्या संपन्न झाला. सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून DC अमोल गोंजारी, आगारव्यवस्थापक उत्तम जोंधळे, नागेश जाधव, तसेच अंजुलगीकर उपस्थित होते. याशिवाय MSRTC चे सर्व अधिकारी, कर्मचारी व इतर मान्यवरांनी कार्यक्रमास उपस्थित राहून प्रकल्पास शुभेच्छा दिल्या.

Smart Services Pvt. Ltd. तर्फे DM प्रसाद गोसावी, ADM शिवदास भंडारे, supervisor सुप्रिया सुतकर तसेच Housekeeping विभागातील सर्व कर्मचारी यांचीही उपस्थिती होती.

मान्यवरांच्या हस्ते प्रकल्पाचे उद्घाटन संपन्न होऊन सोलापूर बसस्थानक येथे Housekeeping व Mechanized Bus Washing सेवांचा अधिकृत शुभारंभ करण्यात आला. या प्रकल्पामुळे बसस्थानक परिसराची स्वच्छता, प्रवाशांना उपलब्ध होणाऱ्या सुविधा तसेच बस स्वच्छतेच्या दर्जामध्ये अधिक सुधारणा होण्यास मदत होणार आहे.

कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडण्यासाठी सहकार्य करणाऱ्या MSRTC प्रशासन, सर्व अधिकारी, कर्मचारी तसेच Smart Services Pvt. Ltd. च्या संपूर्ण टीमचे आभार व्यक्त करण्यात आले.

# आ. सचिन कल्याणशेट्टी यांचे महापौर कोंड्याल यांच्या हस्ते स्वागत



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर महानगरपालिका येथे अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे आगमन झाल्यानंतर त्यांच्या स्वागत महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांचे मनःपूर्वक स्वागत केले.

याप्रसंगी सभागृह नेते नरेंद्र काळे, स्थायी समिती सभापती सौ. रंजीता ताई चकोते, नगरसेवक मनीष केत, माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे, किरण पवार तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.यावेळी सोलापूर शहरतील विविध विषयावर तसेच सामाजिक, शैक्षणिक व विकासात्मक विषयांवर यावेळी सकारात्मक चर्चा झाली.

# आयुक्त डॉ. ओम्बासे 'नो व्हेईकल डे' निमित्त चालत कार्यालयात



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी "नो व्हेईकल डे" निमित्त पर्यावरण संवर्धन व प्रदूषणमुक्त शहराचा संदेश देण्यासाठी अभिनव उपक्रम राबविला. त्यांनी सकाळी आपल्या निवासस्थानातून सोलापूर महानगरपालिका कार्यालयापर्यंत पायी चालत येऊन कार्यालयीन कामकाज पार पाडले. तसेच सायंकाळी कार्यालयीन कामकाज पूर्ण झाल्यानंतर पुन्हा पायीच आपल्या निवासस्थानी परत गेले.

या उपक्रमाच्या माध्यमातून डॉ. ओम्बासे यांनी नागरिकांना वाहनांचा अनावश्यक वापर कमी करून पर्यावरणपूरक जीवनशैली अंगीकारण्याचे आवाहन केले. वाढते वायू प्रदूषण, इंधन बचत आणि नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने पायी चालण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

# शेतकरी बांधवांनी डीएपी खताला पर्यायी खतांचा वापर करावा – कृषी विभागाचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** राज्यात खरीप हंगामास सुरुवात होण्याच्या पार्श्वभूमीवर शेतकरी बांधवांनी केवळ डीएपी (डाय–अमोनियम फॉस्फेट) खतावर अवलंबून न राहता बाजारात उपलब्ध असलेल्या पर्यायी खतांचा वापर करावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

राज्यामध्ये मागील तीन वर्षात खरीप हंगामात सुमारे ४४ लाख मेट्रिक टन रासायनिक खतांचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने युरिया, डीएपी, एमओपी (म्युरेट ऑफ पोटॅश), संयुक्त खते आणि एसएसपी (सिंगल सुपर फॉस्फेट) यांचा समावेश आहे.

महाराष्ट्र राज्य मृदा परीक्षण व जमिनीच्या आरोग्य पत्रिकांच्या आधारे एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन प्रणालीचा अवलंब करणाऱ्या अग्रगण्य राज्यांपैकी एक आहे. खरीप हंगामात डीएपी खताची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. डीएपी खतामध्ये १८ टक्के नत्र आणि ४६ टक्के स्फुरद हे अन्नद्रव्य असते. मात्र, राज्यात डीएपीचा पुरवठा अपेक्षेप्रमाणे होत नसल्याने पयार्यी खतांचा वापर करणे आवश्यक ठरत आहे.

स्फुरदयुक्त खतांमध्ये डीएपीनंतर एसएसपी (सिंगल सुपर फॉस्फेट) खताला विशेष महत्त्व आहे. हे खत देशांतर्गत तयार होत असून त्यामध्ये १६ टक्के स्फुरदासोबत सल्फर व इतर सूक्ष्म अन्नद्रव्येही असतात. विशेषतः तेलबिया पिकांसाठी सल्फरयुक्त एसएसपी खताचा वापर लाभदायक ठरतो. डीएपीच्या एका गोणीऐवजी अर्धी गोणी युरिया आणि तीन गोण्या एसएसपी खतांचा वापर हा प्रभावी पर्याय ठरू शकतो.

याशिवाय एनपीके १०:२६:२६, एनपीके २०:२०:०:१३, एनपीके १२:३२:१६, युरिया–एसएसपी कॉम्प्लेक्स आणि एनपीके १५:१५:१५ यांसारख्या संयुक्त खतांच्या वापरामुळे नत्र, स्फुरद आणि पालाश ही महत्त्वाची अन्नद्रव्ये पिकांना उपलब्ध होतात. त्यामुळे या खतांचा वापर पिकांच्या संतुलित पोषणासाठी उपयुक्त ठरतो.

तसेच टीएसपी (ट्रिपल सुपर फॉस्फेट) खतामध्ये ४६ टक्के स्फुरद अन्नद्रव्य असते. डीएपीच्या एका गोणीऐवजी अर्धी गोणी युरिया आणि एक गोणी टीएसपी खतांचा वापर केल्यास तोही डीएपीसाठी उत्तम पर्याय ठरू शकतो.

चालू खरीप हंगामात शेतकऱ्यांनी उपलब्धतेनुसार एसएसपी, टीएसपी आणि विविध संयुक्त खतांचा वापर करून संतुलित अन्नद्रव्य व्यवस्थापन करावे, असे आवाहन कृषी विभागामार्फत राज्यातील सर्व शेतकऱ्यांना करण्यात आले आहे.